
भाग २
मूठभर गोष्टी
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद
समग्र शिक्षा अभियान-शिक्षण विभाग

# संवाद...

महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांच्या सर्जनशीलतेला आवाहन करून त्यांच्यातील प्रतिभा कथारूप पुस्तकाच्या निमित्ताने आपल्यासमोर ठेवतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

कथा या विद्यार्थी व शिक्षकांचे भावविश्व उमलवू शकतात. कथा सांगताना शिक्षक व विद्यार्थी भेद विसरून एकाच भावनिक पातळीवर स्थिरावतात. आनंद, सुख, दु:ख, भीती, त्याग, बंधुभाव, निष्ठा, प्रेम इ. भावना ते एकाचवेळी समरसून अनुभवतात. वर्गाध्यापनाच्या दृष्टीने आपला परंपरेने चालत आलेला हा ठेवा अतिशय महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांचा शब्दसाठा वाढवणे, वाक्यरचना शिकवणे, भावना व्यक्त करणे, श्रवण, संभाषण या कला विकसित करणे यासाठी कथा हे माध्यम मध्यवर्ती भूमिका बजावते.

सर्व शाळा प्रगत करणे व गुणवत्ता विकास करणे हे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. शिक्षकांमधल्या अंत:स्फूर्तीला, नवनिर्माणक्षमतेला नवे क्षितिज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच ज्या शिक्षकांच्या क्षमतेवर गुणवत्तेचा रथ ओढावयाचा आहे ती विकसित करणेही गरजेचे आहे. ही बाब ओळखून म.न.पा. आयुक्त, मा. डॉ. निपुण विनायक तसेच श्रीमती डॉ. निधी विनायक यांच्या प्रेरणेमधून 'मूठभर गोष्टी' हा कथासंग्रहाचा उपक्रम साकार होत आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेतून कथा लिहिल्या आहेत. शिक्षकदिनी या पुस्तकाचे विमोचन करून सर्व कथालेखक शिक्षकांचा सत्कार करत आहोत. हा आमचा पहिलाच उपक्रम असल्यामुळे आपण निदर्शनास आणून दिलेल्या सूचनांचे भविष्यात स्वागत राहील.

या कामी सहकार्य करणारे साहित्यिक श्रीमती डॉ. लीला शिंदे, प्रा. डॉ. दासू वैद्य, श्री. उद्धव भयवाळ, डॉ. विशाल तायडे, श्री. अबु बकर रहेबर, श्री. संजय कुलकर्णी यांचे विशेष आभार.

**श्रीकांत कुलकर्णी,**
शिक्षणाधिकारी
म.न.पा., औरंगाबाद


**प्रेरणा व संकल्पना**
**डॉ. निपुण विनायक,** (भा.प्र.से.)
आयुक्त, म.न.पा. औरंगाबाद
**डॉ. श्रीमती निधी विनायक**

**मुद्रक :**
**ड्रीम्स् प्रिंट ॲण्ड पॅक**
एम.आय.डी.सी. चिकलठाणा,
औरंगाबाद. मो. 8888888011

**प्रकाशक :**
**श्रीकांत कुलकर्णी**
शिक्षणाधिकारी,
म.न.पा. औरंगाबाद

**मुखपृष्ठ संकल्पना**
**श्री. ज्ञानेश्वर असोलकर**
(कलाशिक्षक)
**श्री. विनोद भोरे**
(कलाशिक्षक)

**मुद्रितशोधन :**
**डॉ. नागेश अंकुश**

**विशेष साहाय्य :**
**ज्ञानदेव सांगळे**
स.का.अ.म.न.पा.
**संजीव सोनार** प्र.सां.अ.

**परीक्षक तथा मार्गदर्शक समिती**
श्रीमती डॉ. लीला शिंदे
प्रा. डॉ. दासू वैद्य
डॉ. विशाल तायडे
श्री. उद्धव भयवाळ
श्री. अबू बकर रहेबर
श्री. संजय कुलकर्णी

# मूठभर गोष्टी

## भाग २

औरंगाबाद महानगरपालिका
शिक्षण विभाग

# अनुक्रमणिका


१. गर्वाचे घर खाली ....................................................................१

२. पाण्याचे पैसे पाण्यात ..............................................................३

३. संकटावर मात ......................................................................५

४. प्रामाणिकपणाचं फळ ................................................................७

५. संघर्ष हाच यशाचा मार्ग ............................................................ ९

६. हुतात्मा बाबू गेणू सैद ..............................................................११

७. मन:शांती ..........................................................................१३

८. मदत केल्यास मदत मिळते..........................................................१५

९. नक्कल पडते महाग ................................................................१६

१०. दृष्टिकोन ........................................................................१७

११. कचरा मुक्त शहर, निरोगी शहर !..................................................१८

१२. दुसऱ्यासाठी हारणे, म्हणजे जिंकणे ..............................................२०

१३. भुकेली पिल्ले ....................................................................२२

१४. वसा स्वच्छतेचा !..................................................................२४

१५. घट्ट मैत्री ..........................................................................२६

१६. कर्तव्य ..........................................................................२७

१७. वहीचे पान ......................................................................२९

# गर्वाचे घर खाली

एक सुंदर बाग होती. त्या बागेत आकर्षक, रंगीबेरंगी फुले असणारी फूलझाडे तसेच फळझाडेदेखील होती. त्या बागेच्या डाव्या कोपऱ्यात एक जुने वडाचे झाड होते. वडाचे झाड ५० वर्षे वयाचे होते. बागेची निगा राखायला एक माळी दररोज बागेत यायचा. तो बागेतील फुलझाडांना, फळझाडांना पाणी घालायचा. सुंदर उमललेली फुले तोडून, फळे तोडून बागेच्या मालकाला द्यायचा. माळी नवीन रोपेदेखील बागेत लावायचा.

एके दिवशी माळ्याने लाल गुलाबाचे रोपटे बागेत आणले. बागेच्या कोपऱ्यात असलेल्या वडाच्या झाडाला विस्तीर्ण पसरलेल्या क्षेत्राच्या बाजूला ते रोप त्याने लावले. माळी दररोज इतर रोपांप्रमाणे लाल गुलाबाच्या रोपास पाणी टाकत असे. ते रोप दिवसेंदिवस मोठे होत होते. काही दिवसानंतर गुलाबाच्या रोपाला कळ्या आल्या व दोन-तीन दिवसांतर कळ्यांचे रूपांतर मनमोहक फुलांमध्ये झाले.

बागेत येणारे लोक लाल गुलाबाच्या झुडपाला आलेल्या सुंदर, आकर्षक फुलांची स्तुती करत. रोपाचे झुडपात व झुडपाचे छोट्या झाडात रुपांतरित झालेले लाल गुलाबाचे झाड लोकांनी केलेल्या स्तुतीमुळे आनंदित व्हायचे. गुलाबाच्या झाडाला वाटायचे की, बागेत येणारे लोक फक्त माझीच स्तुती करीत आहेत. माझी सुंदर फुले, मीच या बागेत सुंदर आहे.

एक दिवस गुलाबाचे झाड वडाच्या झाडाला म्हणाले, ''बघ ! तू तर म्हातारा आहेस. तुझी कुणीही प्रशंसा करत नाही. माझ्या सुंदर फुलांना बघून बागेत येणारे सर्व लोक माझी स्तुती करतात. तू नुसता ओबड-धोबड वाढलायं. तुला तर माझ्यासारखी छान फुलेदेखील येत नाहीत.'' वडाचे झाड शांतपणे गुलाबाच्या झाडाचे म्हणणे ऐकत होते. गुलाबाच्या झाडाला हसू आले व ते परत चेष्टेने वडाच्या झाडाला म्हणाले, ''ए म्हाताऱ्या ! मला माहीत आहे, तू काहीच बोलणार नाही; कारण तुला कळून चुकले आहे की तू माझ्यासारखा सुंदर नाही.'' वडाचे झाड एकही शब्द बोलले नाही.

एके दिवशी सोसाट्याचा वारा सुटला. बागेतील काही छोटी रोपे वाऱ्याच्या तीव्रतेने उन्मळून जमिनीवर पडली. वाऱ्याचा वेग कमी न होता वाढतंच होता. लाल गुलाबाचे झाड-देखील वाऱ्याच्या तीव्र वेगाने घाबरले होते. झाडाची सर्व फुले वाऱ्याच्या झपाट्याने जमिनीवर पडली. आता आपणही जमिनीवर इतर रोपांप्रमाणे उन्मळून पडणार, अशी

भीती गुलाबाच्या झाडाला वाटत होती. गुलाबाचे झाड म्हणत होते, '' वाचवा ! मला वाचवा !! मला जमिनीवर उन्मळून पडण्यापासून वाचवा.'' वडाच्या झाडाला लाल गुलाबाच्या झाडाची दया आली. त्याने आपल्या पाच पारंब्या लाल गुलाबाच्या झाडाभोवती वेढल्या.

आता सोसाट्याचा वाऱ्याचा वेग तीव्र असूनही गुलाबाच्या झाडाला सुरक्षित वाटत होते. वडाच्या झाडाने गुलाबाच्या झाडाचा जीव वाचवला. थोड्या वेळाने वाऱ्याचा वेग कमी झाला. वडाच्या झाडाने गुलाबाच्या झाडाभोवती वेढलेल्या पारंब्या बाजूला केल्या.

वडाचे झाड लाल गुलाबाच्या झाडाला म्हणाले, '' तू मला म्हातारा म्हणाला होतास; परंतु संकटसमयी मी तुझ्या कामी आलो. मी म्हातारा आहे; पण तुझ्यापेक्षा ५० वर्षांनी मोठा आहे. निश्चितच माझा या बागेतील अनुभव, जीवनाचा अनुभव तुझ्यापेक्षा अधिक आहे. मला तुझ्यासारखी सुंदर फुले नाहीत; पण मी बागेत येणाऱ्यांना सावली देतो. लोक माझ्याखाली बसून विलक्षण शांततेचा अनुभव घेतात.''

लाल गुलाबाच्या झाडाचे गर्वहरण झाले होते. त्याने वडाच्या झाडाची क्षमा मागितली व यापुढे गर्विष्ठपणे न वागण्याचे मान्य केले. वडाच्या झाडाचे माहात्म्य लक्षात घेऊन लाल गुलाबाच्या झाडाने वडाच्या झाडासोबत आदराने वागण्याचे ठरवले.

**अग्रवाल मनोज प्रकाश (स.शि.)**

म.न.पा.के.प्रा.शा.हर्सुल, औरंगाबाद.



# पाण्याचे पैंसे पाण्यात

एका गावात एक शेरुदादा नावाचा दूधवाला राहत होता. त्याने गायी–म्हशींबरोबर एक लालू नावाचं माकड पाळलं होत. लालू फार हुशार होता. म्हणून तो शेरुदादाला फार प्रिय होता. त्याला घेऊन ते गावभर फिरत असे. कामाच्या ठिकाणीपण नेत असे. म्हणून लालूला सगळे लोक ओळखत होते. कधी कधी लालू शेरुदादा बरोबर नदीवरही जात असे. तेथे तो दुधामध्ये पाणी टाकताना पाहत असे. विचार करत असे.



एकदा काय झाले शेरुदादा खूप आजारी पडले. त्यांना उठता पण येत नव्हते. आता काय करावं ? दूध कोण घालणार ? पैसे कोण आणणार ? त्यांना लालूची आठवण झाली. आपला लालू हे काम करू शकतो. त्यांनी लालूजवळ दूध पाठवायचे ठरविले. सायकलवर एक पाटी अडकवली त्यावर लिहिले की, ''मी आजारी असल्याने लालूजवळील दूध प्रत्येकाने मोजून घेणे'' प्रत्येक घरी लालू दूध देऊन आला. सर्वांना त्याचे कौतुक वाटले. अन् शेरुदादा तर खूश... गावकरी कमी पाण्याचे दूध येतं म्हणून खूश.. त्यामुळे तो सर्वांचाच आवडता झाला.

दररोज दूध घालण्याचे काम लालू करत होता. शेरुदादाची तब्येत बरी होत होती. पैशांची गरज वाटली म्हणून त्यांनी लालूजवळ पुन्हा एक पाटी लावली ''लालूच्या गळ्यात अडकवलेल्या पिशवीत दुधाचे पैसे टाकावेत.'' लालूने सर्व लोकांचे पैसे जमा केले. दूधही दिले पण यावेळेस मात्र लालूने कमाल केली. त्याने पैसे शेरुदादाला दिलेच नाही तो ते घेऊन नदीकडे जोरात पळाला. लालू पळालेला पाहून शेरुदादाही धूम पळाले. लालू–लालू जोरजोरात आवाज देऊ लागले. त्यांच्यामागे गावातले



लोकं पळू लागले. लालू उंच झाडावर जाऊन बसला. आणि तो एक पैसा नदीत व एक पैसा पिशवीत टाकू लागला. शेरुदादा ओरडू लागले. गाव लालूची करामत पाहू लागला. शेरुदादा शांत बसले व विचार करू लागले व एकदम लालूजवळ येऊन म्हणाले, ''थांब ! लालू मला माझी चूक समजली. मी दुधात पाणी टाकून गावकऱ्यांना देणार नाही तू पाण्यातला पैसा पाण्यातच टाकलाय. मी तुला रागवणार नाही खाली ये चल घरी, तू माझे डोळे उघडलेस, असे म्हणताच लालूने टुणकन् शेरुदादांच्या खांद्यावर उडी मारली. शेरुदादा गावकऱ्यांची माफी मागू लागला. ''मला माफ करा, मी तुम्हाला आजपासून पाण्याचे दूध देणार नाही.'' सर्वांनी लालूचे व शेरुदादाचे टाळ्या वाजवून कौतुक केले व आपापल्या घरी निघून गेले. तेव्हापासून शेरुदादा व लालू समाधानात राहू लागले व आपला धंदा सचोटीने करू लागले.

**सुरंगलीकर कामिनी मिलिंदराव (स.शि.)**

म.न.पा. वि. बनेवाडी, औरंगाबाद.



# संकटावर मात

अस्मिता ! एकदम चुणचुनीत, हुशार आणि एकदम आनंदी मुलगी. तिचे घर होते गावाच्या एका टोकाला. तिच्या घराच्या आजूबाजूला छान हिरवळ होती. झाडे होती. ती तिथे अभ्यास करायची, लोळायची.

अस्मिताच्या घरात तिच्या आई वडिलांबरोबर तिची भावंडं रहायची, असं त्यांचं छान कुटुंब होते. पण घरची परिस्थिती अत्यंत बेताची म्हणून फार अडचणी यायच्या.

घरात अन्नही मोजकंच असायचं. कपडे जेमतेम, अस्मिताला तिच्या मैत्रिणींकडे पाहून त्यांचा खूप हेवा वाटायचा.

ती तिच्या आईला म्हणाली, ''मला एक छान ड्रेस घे ना आई !'' आई म्हणाली, 'हो.'' आईला समजेना की आता ड्रेस कसा घ्यायचा? पण आईने तिची इच्छा पूर्ण केली. अस्मिताला खूप आनंद झाला.

लहानपणापासून ती तिच्या वर्गात प्रथम क्रमांकावर असायची. घरात अनंत अडचणी असायच्या. भावंडांचा खर्च. रोजचा उदरनिर्वाह. आई-वडील सतत काळजीत असायचे की, ''आता या वर्षी अस्मिताचं दहावीचे वर्ष, कसं होईल ? काय होईल ?'' पण अस्मिता त्यांना धीर द्यायची. तिला रात्री जागून अभ्यास करावा लागत असे. कारण अर्धा दिवस शाळेत जायचा आणि नंतर ती काही घरी धुणीभांडी करायची.



घरात लाईट नव्हता. मग अभ्यास कसा करायचा हा प्रश्न ?

मग ती घरातील दिव्यावर अभ्यास करायची. एवढे असूनही ती तिचा वर्गातील पहिला क्रमांक सोडत नसे. म्हणून शाळेतील शिक्षक तिला प्रोत्साहन देत असत.

जेव्हा घरात दिवा लावायला, तेव्हा तेलही नसायचे. तेव्हा मात्र शेजारीच स्मशानभूमी होती. तिथे जाऊन आई-वडिलांसोबत अभ्यास करायची.

जिथे आपण स्मशानभूमी म्हटले तर घाबरतो तिथे ही मुलगी अभ्यास करायची. अस्मिताला प्रेताची कधी भीती नाही वाटली. कारण ती रोज ते पहायची.

शेवटी दहावीची परीक्षा झाली. तिला सर्व पेपर्स चांगले गेले. काही दिवसांनी दहावीचा निकाल लागला. तिने जिल्ह्यात नाव कमावलं. ९५% गुण मिळवून तिने दहावी उत्तीर्ण केली.

त्यावेळेस तिला व तिच्या आई-वडिलांना अश्रू डोळ्यांत मावेनासे झाले. सगळे आनंदाश्रू होते. काय करावे सुचत नव्हते ? कल्पना केली नव्हती असे यश तिला मिळाले होते.



अस्मिताचा खूप मोठा सत्कार करण्यात आला.

**सालगुडे सुदर्शना विनायक**

म.न.पा. नूतन मा.शाळा,

ज्युबली पार्क, औरंगाबाद.

# प्रामाणिकपणाचं फळ



एका गावात राम नावाचा गरीब माणूस राहत. तो खूप कष्ट करायचा. त्याच्या कष्टाच्या बदल्यात कसेबसे पोट भरायचे. त्याला रोज वाटायचे आपण खूप श्रीमंत व्हावे. आपल्याकडे छान कपडे असावे. चांगले घर असावे या विचाराने तो जास्त कष्ट करण्याची तयारी ठेवायचा. मिळेल ते काम तो करायचा.

एक दिवस गावातील एका श्रीमंत व्यापाऱ्याने त्याला बोलावले आणि म्हणाला, ''माझा नेहमीचा नोकर रजेवर आहे. त्याला मी नाव रंगवायला दिली होती. पण त्याने ती रंगवलीच नाही. तू जर ती रंगवून दिली तर मी तुला शंभर रुपये देईल.'' राम हो म्हणाला. ''तो नदीकाठी नाव बघायला गेला. त्याने नाव बघितली. नावेत त्याला मोठे छिद्र दिसले, त्याने ते पाहिले व बुजवले मग छान रंग दिला. व्यापाऱ्याला जाऊन म्हणाला, ''मालक मी नाव रंगवली तुम्ही बघता का ?'' व्यापाऱ्याने नाव बघितली. रामला शाबासकी दिली, ''संध्याकाळी ये, मी तुला पैसे देतो'' असे म्हणाला. राम घरी आला.

दुसऱ्या दिवशी पहाटेच व्यापाऱ्याचे कुटुंब नावेत बसून फिरायला गेले. दुपारी नेहमीचा नोकर व्यापाऱ्याकडे पळत आला. ''मालक आपली नाव कुठे आहे, दिसत नाही ?'', असे विचारले. व्यापाऱ्याने सांगितले सर्व माझे कुटुंब नावेत बसून फिरायला गेले. नोकर दु:खी झाला. व्यापाऱ्याला सांगितले नावेत छिद्र होते. व्यापारी दु:खी होऊन खाली बसला. तेवढ्यात त्याचे कुटुंब आले. ''बाबा नाव



खूप छान होती. आम्ही खूप मजा केली,'' असं सांगू लागले. व्यापाऱ्याला आपले कुटुंब पाहून आनंद झाला.

संध्याकाळी राम पैसे घेण्यासाठी व्यापाऱ्याकडे आला. तेव्हा रामच्या हातात काही नोटा व्यापाऱ्याने दिल्या. रामने पैसे मोजले. ''मालक, आपले शंभरच रुपये ठरले होते. हे तर हजार रुपये आहेत. तुम्ही चुकून मला जास्तीचे पैसे दिले वाटते.''

व्यापारी म्हणाला, ''राम, हे तुझ्या प्रामाणिकपणाचे, कष्टाचे बक्षीस आहे.'' तू हाती घेतलेले काम चोखपणे पार पाडतो. यासाठी तुला माझ्याकडून हे बक्षीस!''

रामने व्यापाऱ्याचे खूप-खूप आभार मानले. तो श्रीमंत जरी झाला तरी त्याने त्याचा प्रामाणिकपणा सोडला नाही.

**एस. एच. जंगले (स.शि.)**

म.न.पा. कें.प्रा.शा. बनेवाडी, औरंगाबाद.



# संघर्ष हाच यशाचा मार्ग !

एका खेडेगावात प्रकाश नावाचा तरुण राहत होता. त्याचे वडील विठोबा हे पाटलाच्या शेतात चाकरी करायचे, तर आई गावामध्ये धुणी-भांडी करून आपल्या कुटुंबाला हातभार लावायची. अशा जेमतेम परिस्थितीत प्रकाशचे कुटुंब हलाखीचे जीवन जगत होते.

अशातच प्रकाशच्या वडिलांना वाटायचे की, प्रकाशने खूप खूप शिकावे व शिकून मोठा साहेब व्हावं. पण प्रकाश मात्र याउलट होता. तो शाळा बुडवायचा, मित्रासोबत उनाडक्या करत फिरायचा आणि दिवसभर खेळत राहायचा. दिवसामागून दिवस जात होते. प्रकाश आता वयाने मोठा झाला होता आणि एक दिवस अचानक प्रकाशची आई आजारी पडली. प्रकाशच्या वडिलांकडे प्रकाशच्या आईला दवाखान्यात न्यायला आणि औषधाला-सुद्धा पैसे नव्हते. आता काय करायचे त्या विचारात प्रकाश आणि प्रकाशचे वडील चिंताक्रांत झाले.

या गोष्टीचा प्रकाशच्या मनावर खूप खोलवर परिणाम झाला. या परिस्थितीने प्रकाशचे डोळे उघडले. ह्यावेळी प्रकाशने ठरविले की आपण शहरात जाऊन नोकरी करायची आणि आपल्या कुटुंबाला हातभार लावायचा. शहरातील हॉटेलात नोकरी करणारे त्याचे चुलत काका गावी आलेले होते. आणि त्याच दिवशी ते शहराकडे परत निघाले तेव्हा वडिलांच्या संमतीने प्रकाशही काकांसोबत शहराकडे नघाला. त्याच्याकडे तिकिटालासुद्धा पैसे नव्हते. काकानेच त्यांचे तिकीट काढले आणि ते शहरात पोहोचले.




शहरात माणसे किड्या-मुंग्याप्रमाणे छोट्या-छोट्या जागेत राहत होती, प्रकाशची पण आता राहायची अडचण झाली, कारण त्याचे काकापण हॉटेलमध्ये कामाला होते आणि तुटपुंज्या पगारामुळेच ते त्याच

हॉटेलमध्ये कसेबसे राहत होते. पण त्या हॉटेलमध्ये बाहेरच्या कोणी राहू शकत नसल्यामुळे प्रकाश बसस्टॅण्डवरच राहू लागला. प्रकाश दररोज सकाळी उठून कामाच्या शोधात निघायचा ; पण अपुरं शिक्षण पाहून या शहरात त्याला कुणीच काम देत नव्हतं. त्याचे काकाही प्रकाशसाठी काम शोधत होते. अशा परिस्थितीत तीन दिवस सरले, कामाच्या शोधात फिरत असताना पोटात भुकेचे कावळे ओरडत होते आणि त्यातच त्याला एका इमारतीचे काम सुरू असल्याचे दिसले. तेथे मात्र त्याला लगेच काम मिळाले. इमारत बांधणे हे काम अतिकष्टाचे होते. या कामावर त्याला एक महिना पूर्ण झाला होता आणि त्यातच पगाराच्या दिवशी ठेकेदार पैसे घेऊन पळून गेल्याचे त्याला समजले.

आता मात्र प्रकाश अगतिक झाला, गुडघ्यांवर डोके ठेवून धाय मोकलून रडला, आणि विचार करू लागला की आपल्या सारख्या कित्येक कामगारांवर हा अन्याय झाला आहे. अनेक कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असेल, आणि हे सर्व थांबायला हवे. यासाठी त्याने सर्व कामगारांना एकत्रित केले. होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. या गोष्टींची दखल कंपनीला घ्यावीच लागली आणि सर्व कामगारांना न्याय मिळाला.

प्रकाशच्या या कामगार आंदोलनाची बातमी देशाच्या राष्ट्रपतींना कळली आणि राष्ट्रपतींच्या हस्ते त्याचा सत्कार झाला. ही बातमी सर्व पेपरच्या पहिल्या पानावर छापून आली, हे पाहून प्रकाशचे वडील विठोबांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. कारण त्यांचा निकामी, कामचुकार मुलगा आज हजारो कामगारांचा नेता झाला होता, अनेकांचा आधार झाला होता !

**प्रवीण भास्कर नरवडे (स.शि.)**

म.न.पा. प्रा.शाळा, रोहिदासपुरा, औरंगाबाद

# हुतात्मा बाबू गेणू सैद



पहा विद्यार्थी मित्रहो ! ''गोष्ट आहे एका कोवळ्या तरूण पोराची. खूप निष्ठावंत, धैर्यशील आणि धाडसी मुलगा होता तो ! काय केलं असेल बरं त्याने ?'' ज्यामुळे त्याचे नाव भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अजरामर झाले.

ऐका तर, त्याचे नाव बाबू गेणू सैद होते. त्याचा जन्म पुणे जिल्ह्यातील महाळुंगे या गावी सन १९०८ साली अत्यंत गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबात झाला तो २ वर्षांचा असतानाच त्याचे वडील वारले म्हणून त्याची आई रोजी-रोटी साठी मुंबईला येऊन एका कापड मीलमध्ये काम करू लागली व त्याची बहीण इतरांच्या घरी भांडी घासण्याचे व कपडे धुण्याचे काम करू लागली. बाबूपण आईला हातभार म्हणून तिच्या सोबत काम करू लागला.

आजूबाजूचे पारतंत्र्य बघून तो जसा-जसा मोठा होत राहिला तसा-तसा त्याच्या रक्तात स्वातंत्र्यासाठी काहीतरी करण्याचा ध्यास सुरू झाला. त्याने १९३० साली वडाळा येथे महात्मा गांधीसोबत झालेल्या सत्याग्रहात भाग घेतला म्हणून त्याला सक्त मजुरीची शिक्षा झाली. पुढे ब्रिटीश मालकीच्या कपड्यावर, शाळेवर बहिष्कार टाका असे थोर नेत्यांनी सांगितले. तेव्हा दि. १२ डिसेंबर १९३० रोजी विदेशी कपडे घेऊन एक ट्रक दुकानाकडे चालला होता. तो ट्रक बाबू गेणू यांनी अडवला.मग पोलिसांनी त्यांना बाजूला खेचण्याचा प्रयत्न केला. पण बाबू गेणू ऐकायला तयार नव्हते. शेवटी ट्रक जाऊ नये म्हणून ते भर रस्त्यात आडवे झाले. त्यांना वाटले आता तरी ट्रक जाणार नाही. पण ब्रिटीश पोलीस व कर्मचारी इतके क्रूर होते की त्यांनी तो ट्रक सुरू केला. व सरळ रस्त्यावर आडव्या असणाऱ्या बाबू गेणू यांच्या अंगावर घालून पुढे नेला.

तेवढ्यात जोरात किंचाळण्याच्या आवाज ऐकून सर्व जनता रोड वर आली. पाहता तर काय बाबू गेणू रक्त्याच्या थारोळ्यात पडून गतप्राण झालेले. मित्रांनो, तेव्हा त्यांचे वय होते अवघे २२ वर्षे.


भारतीय जनतेने तो ट्रक रागाच्या भरात जाळून टाकला. देश एका शूर वीराला मुकला व बाबू गेणू भारतीय इतिहासात हुतात्मा झाले. देशावर प्रेम करणारा असा अवलिया होणे नाही. अशा थोर तरुणाच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !'

**शेरखाने अमोल विलास (स.शि.)**

म.न.पा. कें.प्रा.शा., बनेवाडी, औरंगाबाद



# मन:शांती



एकदा संत एकनाथांना कोणी दोन प्रश्न विचारले. एक त्यांच्या स्वत:चा भविष्याबद्दल आणि दुसरा एकनाथ स्वभावाने एवढे शांत आणि निष्कपट कसे राहू शकतात ? यावर संत एकनाथ हसले आणि केव्हातरी याची उत्तरे देईन, असे म्हणाले.

काही दिवसांनी, संत एकनाथांची त्या गृहस्थाशी भेट झाली. तेव्हा त्याला बाजूला नेऊन एकनाथ म्हणाले, ''तुझ्या पहिल्या प्रश्नांचे उत्तर देण्याची वेळ आली आहे. कारण दुर्दैवाने तू आता सात दिवसांच्या आत मरणार आहेस.'' तो गृहस्थ सुन्न झाला. गोठला ! संत एकनाथ समोरून निघून गेले तेव्हा तो बधीर मनाने घरी पतरला.

जगलो तर एकनाथांसारख्या संतांच्या सदिच्छेने जगू अशी त्याच्यात भावना निर्माण झाली. ती त्याने सार्थ केली. आयुष्यातले सात दिवस पूर्ण करुन आठव्या दिवशी संत एकनाथांच्या दर्शनाला तो गेला. संत एकनाथांना हात जोडून म्हणाला, ''तुमच्या कृपेने वाचलो !'' संत एकनाथ म्हणाले, ''आता मी तुम्हाला दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर देणार आहे. गेले सात दिवस तुम्ही कसे वागलात ? इतरांवर किती रागावलात ?''

तो गृहस्थ उत्साहाने म्हणाला, ''कसला हो रागावतो ? आठ दिवस अगदी शांत गेले. शांत म्हणजे, मरणाच्या भीतीने बेचैन होतो. पण दुसऱ्यावर रागावण्यासाठी ती बेचैनी नव्हती. घरात बायकोशी कधी भांडलो नाही, मुलांना मारले नाही. वाटायचे की, आता

अखेरचे सात दिवस उरले. बायका-मुले पुन्हा दिसणार नाहीत; त्यांना का दुखवावे ? अहो शेजाऱ्यांचे जमिनीवरुन चार पिढ्यांचे भांडण होते त्याला स्वत:च्या हाताने हवा तो तुकडा तोडून दिला. देणे होते ते देऊन टाकले. ज्यांच्याकडून येणे होते, त्यांच्यापैकी जे गरीब होते, त्यांचे येणे सोडून दिले काही पैसे गमावले, पण शांती कमावली, खूप खूप शांतअसे आठ दिवस त्या दृष्टीने गेले.''

एकनाथ समोरच्या माणसाच्या पाठीवर हात थोपटून म्हणाले.

''हे तुझ्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर! सात दिवस जग सोडून जायचे आहे, अशा कल्पनेने मी सदाच वावरतो म्हणून मी शांत वाटतो. ''प्रत्येकाला आठवड्यातील कोणत्याही एका दिवशी जग सोडून जायचे आहे. त्यासाठी आपण शांतीनेच जगावे.

**माकणीकर आर. एस.(स.शि.)**

म.न.पा., बनेवाडी, औरंगाबाद.



# मदत केल्यास मदत मिळते.



एक कुत्रा होता. तो त्याच्या मालकाच्या घराची राखण करायचा. त्याचा मालकसुद्धा कुत्र्याची खूप काळजी घेत असे. त्याला दररोज अंघोळ घालून स्वच्छ ठेवत असे. त्याला खायला दूध पोळी देत असे. अशा प्रकारे कुत्रा सुखी जीवन जगत होता.

एक दिवशी एक उंदीर कुत्र्याकडे आला आणि म्हणाला, ''अरेरे, कुत्रेदादा ! मला तुझी खूप दया येते.''

कुत्रा म्हणाला, ''का, रे ? मी तर एकदम सुखी आहे. मग तुला माझी दया येण्यासारखं झाले तरी काय ?''

उंदीर म्हणाला, ''अरे, तू एवढा मोठा प्राणी आहेस तर मग माणसासाठी एवढी मेहनत कशाला करतोस ?''

कुत्रा म्हणाला, ''त्यात काय झाले ? मी माणसांसाठी उपयोगी पडतो, राखण करतो तर तोदेखील माझी चांगली सेवा करतो.''

उंदीर म्हणाला, '' तू अगदी बावळट आहेस, अरे माझ्याकडे बघ, मी तुझ्यापेक्षा आकाराने किती लहान आहे, तरीसुद्धा माणसाचे काहीही काम न करता, मी पाहिजे ते खातो, नासाडी करतो.



कुत्रा म्हणाला, '' म्हणूनच मनुष्य तुला पाहताक्षणीच मारून टाकण्याचा प्रयत्न करतो. मी माणसाची मदत करतो म्हणून तोसुद्धा माझी काळजी घेतो, माझ्यावर माया करतो, अशा तऱ्हेने आम्ही दोघेजण एकमेकांच्या कामास येत असतो.

**भगवान मोतीराम साळुंके (स.शि.)**

म.न.पा.प्रा.शा.वाल्मी, औरंगाबाद.

# नक्कल पडते महाग




एका जंगलात घार आणि कावळा दोघे मित्र राहत होते. रोज झाडाच्या फांदीवर बसून गप्पा मारत तर कधी आकाशात फिरत. घारीच्या पंखात खूप ताकद असल्यामुळे ती खूप उंच आकाशात जाई. पंख मोठे असल्यामुळे आकाशात उंच भरारी घेत. हे पाहून कावळ्याला हेवा वाटे. आपल्याला घारी इतके का उंच उडता येत नाही ? घारी–सारखी झेप का घेता येत नाही ? त्याला प्रश्न पडला. घारीसारखे कावळा पण मोठे पंख पसरवत असे, सूर मारण्याचा प्रयत्न करीत असे. घारीने आपले भक्ष्य पकडण्यासाठी उंच झेप घेतली त्या कावळ्यानेपण झेप घेतली पण त्या भक्ष्याचे लक्ष कावळ्याकडे गेले आणि कावळ्याचे भक्ष्य असलेला छोटासा प्राणी दगडामागे लपला. कावळ्याने घारीसारखा सूर मारण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याची चोच दगडावर आपटली आणि तो जखमी झाला. जखमी झाल्याचे घारीने पाहिले. तिने त्याला जखमी होण्याचे कारण विचारले असता कावळ्याने सर्व हकीकत सांगितली. तेव्हा घारीने सांगितले. 'तेच चुकले तुझे' कुणाची नक्कल करू नये. प्रत्येक प्राण्याची ताकद वेगवेगळी असते. कुणी कुणाचा हेवा करू नये. तेव्हा कावळा शहाणा झाला व म्हणाला, ''कुणाची नक्कल करू नये. 'नक्कल पडते महाग' हे मला आज कळाले!

**भडगावकर व्ही. ए.(स.शि.)**

म.न.पा. प्रा.शा. गारखेडा, औरंगाबाद



# दृष्टिकोन




एके दिवशी सातवीच्या वर्गामध्ये गणिताचा तास सुरू होता. बिंदू, रेषाखंड हे फळ्यावर काढून शिक्षक शिकवत होते. विविध मापांचे रेषाखंड मोजून काढून दाखवल्यावर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही मापे दिली व सांगितले की, दिलेल्या मापांची रेषाखंड वहीत काढा. विद्यार्थी रेषाखंड काढण्यात मग्न झाले. वर्गातील एक विद्यार्थी उभा राहून म्हणाला, 'सर, कृपया, मला ५ सेंमी लांबीचा रेषाखंड काढून दाखवा', सरांनी फळ्यावर मोजून ५ सेंमी लांबीचा रेषाखंड काढला. त्यानंतर दुसरा मुलगा उभा राहिला व म्हणाला, ''सर, मला ३ सेंमी लांबीचा रेषाखंड काढून दाखवा. सरांनी ताबडतोब ३ सेंमी लांबीचा रेषाखंड फळ्यावर मोजून काढला. दोन्ही रेषाखंड काढून झाल्यावर वर्गातील एक खोडकर मुलगा उभा राहून म्हणाला की, ''सर, तुम्ही दुसरा रेषाखंड का बर काढला ? पहिल्या रेषाखंडालाच थोडं पुसून टाकायचे.'' वर्गातील इतर मुले त्याच्या बोलण्यावर हसली. पण सरांनी मात्र ही गोष्ट गांभीर्याने घेतली व 'रेषाखंड' या घटकावरून एक महत्त्वाची गोष्ट विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. ''मुलांनो ज्याप्रमाणे आपण पहिला मोठा रेषाखंड व नंतर छोटा असे रेषाखंड काढले याचप्रमाणे आपल्याला जीवनात बऱ्याचदा अशी वेळ येते की, दुसऱ्यांच्या तुलनेत कामाला कमी न करता, त्यात काही खोड्या न करता आपलं स्वत:च काम उत्कृष्ट करायचं व आपलं वेगळं अस्तित्व निर्माण करायचं. यावरुन पुन्हा सर 'रेषाखंड' मुद्यावर आले व म्हणाले की, जसे अमोल म्हणाला, की पहिला रेषाखंड थोडा पुसून टाकायचा, म्हणजे दुसरा रेषाखंड काढण्याची गरज नाही' हे चुकीचे आहे.

मुलांच्या लक्षात आले की, 'दुसऱ्याला कमी न दाखवता आपण आपले उत्कृष्ट असे काम करावे.' गणितातील ज्ञानाबरोबर जीवनातील चांगले तत्त्वज्ञान आज आपण विद्यार्थ्यांना सांगितल्याचे समाधान घेऊन शिक्षक दुसऱ्या तासिकेसाठी वर्गाच्या बाहेर निघून गेले.

**मेघा कदम (स.शि.)**

म.न.पा.कें.प्रा.शाळा, बनेवाडी, औरंगाबाद.

# कचरा मुक्त शहर, निरोगी शहर !

एक मुलगा होता त्याचे नाव होते रमेश. तो औरंगाबादच्या सिल्कमील कॉलनीत राहत होता. त्याच्या घरात त्याचे आजोबा, आई-वडील, काका-काकू असा मोठा परिवार होता. एकदा रमेश आणि त्याची काकू एकटेच घरी होते.



तेव्हा त्यांच्या घरी महानगरपालिका कर्मचारी आले व ओला कचरा, सुका कचरा व कचरा व्यवस्थापनाविषयी माहिती देऊ लागले. पण रमेशची काकू निरक्षर होती. अज्ञानामुळे तिने त्या म.न.पा. कर्मचाऱ्यांना अरेरावीची भाषा केली व म.न.पा. प्रशासनाला नावे ठेवू लागली. त्याचे काहीच ऐकून घेत नव्हती.

रमेशला हा प्रश्न पडला की, ओला कचरा व सुका कचरा काय असतो ? हे व्यवस्थापन कशासाठी ? दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर रमेशने त्याच्या शाळेतील मॅडमला हे प्रश्न विचारले. मग मॅडम म्हणाल्या, ''बेटा. रमेश, ओला कचरा म्हणजे मातीत मिसळणारे व ज्यापासून सेंद्रीय खत तयार केले जाते. सेंद्रीय खताचा वापर करून उगवलेल्या फळभाज्या आरोग्यासाठी सर्वांत उत्तम असतात. कमी खर्चात हे खत तयार होते. रासायनिक खतांचा वापर करून उगवलेल्या भाज्यामुळे ते रसायन पोटात जाण्याची व शरीराला इजा पोहचण्याची शक्यता असते.''




हे ऐकून रमेशला डॉक्टरकाका आठवले जेव्हा आजोबाला दुधीचा ज्यूस प्यायल्यामुळे त्रास झाला होता. डॉक्टरकाका म्हणाले होते की, ''केमिकल खताच्या भाज्यामुळे हे असले

त्रास वाढले म्हणून.''

पुढे मॅडम म्हणाल्या, ''किचनमधील भाज्यांची साल, फळांची उरलेली साल, कचरा हा ओल्या भाज्यांत मोडतो. आणि सुका कचरा म्हणजे, ज्याची विल्हेवाट लावता येत नाही, जसे कॅरीबॅग, प्लॉस्टिक, पेपर इत्यादी यांच्यामुळे प्रदूषण वाढतं. यांना पुनर्निर्माण केलं जात. ओल्या व सुका कचऱ्या व्यतिरिक्त इजा पोहचवणारा कचरादेखील असतो जसे ब्लेड, सुई, दवाखान्यातील वस्तू हेपण वेगळे करायचे.''

बाई म्हणाल्या, ''ओल्या व सुक्या कचऱ्याच्या व्यवस्थापनामुळे आपल्याला आता व भविष्यात आरोग्य चांगलं ठेवण्यास मदत होईल. रमेश, तर मग तूपण करणार ना आजपासून कचरा व्यवस्थापनाची सुरुवात !''

रमेश म्हणाला, '' हो मॅडम नक्की''.

''ओल्या व सुक्या कचऱ्यांची करू छाटणी..

शहराला मिळेल आता नवीन कलाटणी..''

देशमुख शगफ जरीन खलील (स.शि.)

म.न.पा.प्रा.शा.सिल्कमील कॉलनी, औरंगाबाद.



# दुसऱ्यासाठी हारणे, म्हणजे जिंकणे



एका नावाजलेल्या महाविद्यालयात संजय नावाचा एक विद्यार्थी शिक्षण घेत होता. संजयला अभ्यासाबरोबर खेळाचीही खूप आवड होती. तो नेमबाजी ह्या खेळात प्रवीण होता. चांगले गुण व विनम्रता यांमुळे तो शिक्षकांमध्येही प्रिय होता,लाडका होता.

एकदा महाविद्यालयात वार्षिक महोत्सव होता. या महोत्सवात नेमबाजीचीही स्पर्धा ठेवण्यात आली होती. बऱ्याच महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. प्राचार्य प्रत्येक विद्यार्थ्यांशी परिचय करुन घेत असताना दुसऱ्या महाविद्यालयातील गणेश नावाचा एक विद्यार्थी प्राचार्यांना मोठ्या आत्मविश्वासाने म्हणाला, ''सर, मी संजयपेक्षा जास्त अचूकतेने नेम साधू शकतो. संजयला पराजित करणे हे माझे लक्ष्य आहे!''

गणेशचे म्हणणे ऐकून प्राचार्य मनाशीच स्मित हास्य करून पुढे गेले. कारण त्यांना माहीत होते की संजयला हरवणे इतके सोपे काम नाही. स्पर्धा सुरू झाली स्पर्धेचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. एका दोरीला एक लाकडी फळ बांधले होते. त्यांचा वेध नेमबाजांनी घ्यायचा होता.

स्पर्धा सुरु झाली. एक-एक स्पर्धक येऊन प्रयत्न करून पाहू लागले; पण त्यांना यश आले नाही. शेवटी गणेश आणि संजय हे दोघेच मुख्य प्रतिस्पर्धी उरले, गणेशने यावेळी पुढाकार घेतला त्याने पहिला नेम अचूकपणे साधला. दुसरा नेम त्याचा हुकला आणि तिसराही नेम योग्य पद्धतीने साधला. आता संजयची वेळ होती. मुलांनी टाळ्यांचा कडकडाट करुन त्याला प्रोत्साहन दिले. संजयने पहिला नेम धरला तो चुकला. दुसरा नेम धरला तोही चुकला आणि तिसराही नेम त्याचा लागला नाही. संजय पराजित झाला. सगळे मुले, मित्र शिक्षक नाराज झाले होते. संजय प्रथमच पराजित झाला होता.

प्राचार्यांना व शिक्षकांना संजय पराजित झाला यावर विश्वास बसेना. शिक्षकांनी संजयला बोलावून घेतले व विचारले असता संजयने सांगितले ''सर, गणेशला बाहेर त्यांच्या

मित्रांबरोबर बोलताना ऐकले की त्याची परिस्थिती खूप गरिबीची व नाजूक आहे. या पुरस्काराच्या रकमेतून तो त्याची शालेय फी भरणार आहे. मी या गोष्टीची सत्यता पडताळून पाहिली सर.''



''सर, माझ्या पराजित होण्याने जर कुणाच्या आयुष्याचे कल्याण होत असेल तर मी हरायला तयार आहे. सर मला माफ करा यामुळे आपल्या सर्वांचा अपेक्षाभंग झाला. पण त्यातून एका विद्यार्थ्याचे आयुष्य उभारेल याचं मला खूप समाधान आहे.'' या त्याच्या समजूतदार बोलण्याने सर्वांनीच टाळ्या वाजवल्या व प्राचार्यांनी संजयचे कौतुक केले व एक विशेष गुणवान विद्यार्थी म्हणून अभिनंदन केले.

**एम. के. कदम (स.शि.)**

म.न.पा.बनेवाडी, औरंगाबाद

# भुकेली पिले



यश दररोजप्रमाणे शाळेच्या मैदानात आला तर त्याचे लक्ष मैदानातील चार कुत्र्यांच्या पिल्लांकडे गेले. ती पिले बारीक व कमजोर झालेली होती. बहुतेक त्यांना बऱ्याच दिवसांपासून अन्न मिळाले नसावे. त्यांची आईपण आजूबाजूला कोठे दिसत नव्हती. ती पिले शाळेत येणाऱ्या मुलांच्या पायाजवळ शेपटी हलवत येत. तेव्हा काही मुले पायाने ढकलत, तर काही दगड मारुन हाकलून देत. इतर मुलांप्रमाणेच यशजवळ देखील ती पिले आली. यश पटकन खाली बसला आणि पिलांच्या अंगावरून हात मायेने फिरवू लागला. त्याचबरोबर ती पिले यशाच हातापायाला शेपटी हलवून प्रेमाने चाटू लागली. लगेच यशच्या लक्षात अले की पिले बऱ्याच दिवसांपासून उपाशी आहेत. यांना खाण्यास काहीतरी दिले पाहिजे. त्याने पटकन आपल्या दप्तरातून डबा काढला. त्यातील दोन पोळ्या त्या पिलांना खाण्यास टाकल्या. त्या पिलांनी त्या पोळ्यांना लगेच खाऊन टाकल्या आणि ती पिले शाळेच्या इमारती आड जाऊन बसली. हे सर्व शाळेचे मुख्याध्यापक गेटसमोर उभा राहून पाहत होते. यश मोठ्या समाधानाने वर्गात जाण्यास निघाला. पण समोर मुख्याध्यापकांना पाहून घाबरला. आता आपल्याला शिक्षा होणार असे त्याला वाटले. मुख्याध्यापकांनी जवळ बोलावले, ''यश हे काय करत होतास ?''

यश शांत आवाजात म्हणाला, ''सर ती पिले, भुकेली होती. त्यांना मी माझ्या डब्यातील पोळ्या खाण्यास दिल्या.'' मुख्याध्यापक दटावून म्हटले, ''आता तू काय खाणार आहेस ?'' यश म्हणाला ''सर मी, शाळेची खिचडी खाईल.'' मुख्याध्यापक यांना यशचे नवल मोठे नवल वाटले आणि त्याला वर्गात जाण्यास सांगितले. यश वर्गात जाऊन बसला पण त्याचे वर्गात मन लागत नव्हते. तो सारखा त्या पिलांचा विचार करु लागला. या लहान पिलांना त्यांची आई शाळेच्या मैदानात सोडून का गेली ? पिलांना काहीच अन्न मिळाले नाही तर ? कोणी त्यांना मारुन टाकले तर, त्या पिलांना जगण्याचा अधिकार नाही का ? त्या पिलांना सांभाळण्यासाठी काय करायला पाहिजे ?' असे अनेक प्रश्न त्याच्या मनात येऊ लागले. त्याचे वर्गात लक्षच लागत नव्हते. अचानक त्याच्या मनात एक विचार आला. 'आपण या पिलांचा सांभाळ करायचा.

यश शाळा सुटल्यानंतर घरी गेला व शाळेतील सर्व घटना आईला सांगितली.

'यश तू शाळेत जेवला नाहीस का ?'' आईने विचारले. आई मी माझा डबा पिलांना खाण्यास दिला आणि मी शाळेतील खिचडी खाल्ली', यश म्हणाला. ''शाब्बास, यश चांगले काम केलेस'' आईने प्रोत्साहन देत म्हटले. यशला बरे वाटले. तो आईला म्हणाला, 'आई उद्यापासून मला पाच पोळ्या आणि १० रुपये दे.'', ''अरे एवढ्या पोळ्या आणि १० रुपयाचं काय करणार आहेस ?'' आईने विचारले. मी पिलांना दूध पोळी खाण्यास देणार आहे.'' यश म्हणाला, 'बरं बाबा देईल.' आईने होकार दिला. यशने आनंदाने आईला मिठी मारली.

यश दुसऱ्या दिवशी उत्साहाने शाळेत निघाला. रस्त्यात यशने दुकानातून १० रुपयांची दुधाची पिशवी घेतली आणि शाळेच्या मैदानात आला. पिले यशची वाट पाहत होती. यशला पाहताच पिले यशकडे धावत गेली व त्याच्या पायांवर उड्या मारु लागली. शेपटी हलवून पाय चाटू लागली. लगेच यशने खाली बसून सर्व पिलांच्या अंगावरून प्रेमाने हात फिरवले आणि पटकन आपल्या दप्तरातून पोळ्यांचा डबा काढला. डब्यात पोळ्या कुस्करल्या व दुधाची पिशवीतले दूध त्यामध्ये एकत्र करुन पिलांना खाण्यास दिले. पिलांनी आनंदाने दुधपोळी फस्त केली आणि शाळेच्या इमारती मागे जाऊन झोपली. यश मोठ्या समाधानाने वर्गात गेला. यशचा हा उपक्रम सारखा महिनाभर चालू होता. आणि हे सर्व शाळेचे मुख्याध्यापक व मुले दररोज पाहत होती. आता महिनाभरात कुत्र्यांची पिले चांगली गुबगुबीत मोठी झाली होती.

आता ऑक्टोबर महिना सुरू झाला. मुख्याध्यापकांनी ४ ऑक्टोबर जागतिक प्राणिदिवस शाळेत साजरा करण्याचे ठरवले. या दिवशी शाळेच्या मैदानात कार्यक्रम सुरु झाला. मुख्याध्यापकांनी मुलांना मार्गदर्शन केले आणि यशला स्टेजवर बोलावले. यशने पिलांना कशाप्रकारे सांभाळले हे सर्व मुलांना सांगितले. यशला गौरविले. ''तुझ्यासारखा प्रेमळ विद्यार्थी आमच्या शाळेत आहे जो इतरांसाठी जगतो तोच खरा आदर्श माणूस. आम्हाला तुझा अभिमान आहे.'' मुख्याध्यापकांनी यशला एक चांगला प्राणिमित्र म्हणून प्रमाणपत्र दिले. ती चार पिले सांभाळण्यास घरी घेऊन जाण्यास परवानगी दिली.

यश ते प्रमाणपत्र आणि ती पिले घेऊन आंनदाने घरी गेला आणि आईला ते प्रमाणपत्र व पिले दाखवली. आई फार आनंदी झाली. यश आज वन्यजीव अधिकारी आहे.

**हरिच्चंद्र पिराजी मोरे (स.शि.)**
म.न.पा. प्रा.शा., वाल्मी, औरंगाबाद.

# वसा स्वच्छतेचा




ही गोष्ट आहे एका श्रीमंत माणसाची. त्याला वाटायचं हे सगळं जग स्वच्छ व सुंदर असायला पाहिजे. त्याच्याकडे खूप पैसा होता म्हणून त्याने सगळ्या देशांच्या प्रमुखांची भेट घेतली. त्यांनी सांगितले की, हे सगळे जग आपल्याला स्वच्छ करायचे आहे. त्यासाठी मी तुम्हांला पैशाची मदत करेन परंतु; एका वर्षाच्या आत सगळं जग स्वच्छ झाले पाहिजे.''

सगळे आपापल्या कामाला लागले, परंतु एक वर्षानंतर त्याने पाहिले की, सगळीकडे स्वच्छता झालीच नाही. कुठे कुठे कचऱ्याचे ढीग दिसायचे तर कुठे घाणीमुळे रोगराई पसरलेली दिसायची. मग त्याने विचार केला की सगळ्या देशातील लोक काही सुधारायचे नाही. आपण पहिल्यांदा आपल्याच भारत देशाला स्वच्छ बनवावे. म्हणून त्याने आपल्या देशातील पंतप्रधानांची भेट घेतली आणि सगळ्या राज्यातील मुख्यमंत्र्यांना सांगून त्यांना पैसा देऊन हा उपक्रम सर्व राज्यांत राबविण्यास सुरवात केली. सगळी राज्ये एक वर्षाच्या आत स्वच्छ करायला सांगितली.

एक वर्षानंतर त्याने पुन्हा पाहिले की, सगळीकडे अस्वच्छता आहे तशीच आहे मग तो पुन्हा चिडला व म्हणाला, 'सगळा देश कधीच सुधारायचा नाही. आपण आपले राज्य सुधारूया.'' असे म्हणत त्याने राज्यातील सगळ्या जिल्ह्यांना एका वर्षाची मुदत व पैसे देऊन तो निघून गेला. एक वर्षानंतर त्याने पुन्हा पाहिले सगळीकडे कचरा आहे तसाच आहे. मग तो स्वत:च्या गावच्या सरपंचांना भेटला व म्हणाला, ''आपण फक्त आपले गाव स्वच्छ करूया. मात्र हे सगळे एक वर्षात झाले पाहिजे.''

एक वर्षानंतर त्याने पाहिले की, गावात सगळीकडे कचरा तसाच होता. मग तो पुन्हा चिडला व म्हणाला, ''गावातले लोक काही सुधारणार नाहीत, आपण आपले घर तेवढे स्वच्छ ठेवू या. असे म्हणत त्याने स्वत: झाडू हातात घेतला व स्वत:चे घर व परिसर स्वच्छ करायला सुरूवात केली. बाहेरचे अंगण, बाग सगळे त्याने स्वच्छ केले आणि सगळा कचरा कचराकुंडीत नेऊन टाकला.

हा माणूस एकटाच काम करतोय, हे बघून त्याच्या घरातले इतर सगळे लोकही

साफसफाईला लागले. त्यामुळे त्याचे सगळे घर व घराच्या आजूबाजूचा परिसरसुद्धा स्वच्छ व सुंदर झाला. मग शेजारच्या घरच्या लोकांनाही वाटले की आपले घरसुद्धा त्याच्यासारखेच स्वच्छ व सुंदर दिसले पाहिजे. म्हणून शेजारच्या घरातले लोकसुद्धा झाडू घेऊन कामाला लागले.

असे करत करत सगळे गावच स्वच्छ झाले. मग ही बातमी शेजारच्या गावात समजल्यावर तिथले लोकसुद्धा स्वच्छतेच्या कामाला लागले असे करता करता आजूबाजूची सगळी गावं, नंतर सगळा जिल्हा, संपूर्ण राज्य आणि शेवटी देश स्वच्छ व सुंदर दिसू लागला आणि त्यानंतर सगळे जग सुंदर झाले.

त्या माणसाला कळून चुकले की, आतापर्यंत सगळा देश स्वच्छ होत नव्हता. कारण असे की, तो स्वत:च्या घरापासून कधी सुरुवात करत नव्हता.

**दाभाडे सीमा स्वराज (स.शि.)**

म.न.पा., एकनाथनगर, औरंगाबाद.



# घट्ट मैत्री



एका शाळेत इ. ४ थी वर्गात शिवानी आणि रेखा नावाच्या दोघी मैत्रिणी शिकत असतात. या दोघी अतिशय घट्ट आणि जीवाभाच्या मैत्रिणी असतात.

त्या शाळेत सोबत जाणार, खेळायला सोबत, अभ्यास सोबत डान्सची आवड शिवानीला खूपच असते. तिच्यासोबत राहून रेखालाही खूप आवड निर्माण झाली. त्या दोघींनी दोन वर्षांपासून स्पर्धामध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. आणि ह्या वर्षी हॅट्ट्रीक करायची त्यांची तयारी सुरु असते. आणि अचानक त्या दिवशी नृत्याचा सराव सुरु असताना शिवानी खाली कोसळते. तिच्या तळपायाला दुखापत होते आणि आता या स्पर्धेत शिवानी सहभागी होऊ शकत नाही हे डॉक्टरांनी सांगितले. दोघीजणी भेटल्या. शिवानी म्हणू लागली ''आपल्यला भाग घेता येईल का? आपले स्वप्न पूर्ण होईल का ? हे असं का घडलं ? तू मागे पडू नकोस, तू ह्या वर्षी स्पर्धेत सहभागी होऊन आपले स्वप्न पूर्ण कर. मी कायम तुझ्यासोबत आहे.'' असे रेखाला जेव्हा शिवानी म्हणते तेव्हा रेखा जोमाने सराव करायला लागली.

सगळे जण शिक्षक, आई-वडील मैत्रिणी सगळ्यांच्या पाठिंब्याने रेखा मेहनत घेते. आणि सरते शेवटी स्पर्धेचा दिवस उजाडतो आणि तिचे सादरीकरण होते. रेखा शिवानीची वाट बघत असते. शिवानी येताच दोघी एकमेकींना भेटतात आणि आनंदाने शिवानी रेखाला शुभेच्छा देते. रेखाचा सादरीकरण होतो. अतिशय सुंदर सादरीकरण होते. शेवटी निकाल जाहीर होतो आणि त्यात रेखाचा पहिला क्रमांक येतो.

बक्षीस घेताना रेखा आणि शिवानी दोघी मिळून बक्षीस स्वीकारतात. आणि त्यांचे स्वप्न पूर्ण होते. शाळेने हॅट्रिक (पूर्ण) केली. संपूर्ण शाळेतील विद्यार्थी, सभागृहातील सर्व मंडळींनी एकच जल्लोष केला. दोघींच्या नावांची घोषणा देत सभागृह दणाणून सोडले. सगळे जण आनंदित झाले!

**रेणुका कागदे (साधनव्यक्ती)**

म.न.पा., स.शि.अ. औरंगाबाद.

# कर्तव्य



एकदा इंद्रदेव सर्वांवर कोपले. त्यांनी शाप दिला. पुढची १२ वर्षे पाऊस पडणार नाही व तशी आकाशवाणीही केली. पृथ्वीवर सर्वदूर हाहाकार माजला. सर्व जण हताश झाले. १२ वर्षे पाऊस येणार नाही म्हणजे सर्व मनुष्य, प्राणी दुष्काळाने मरणार या विचाराने सर्व जण घाबरून गेले.

एक शेतकरी जंगलातून रोज पाणी घेऊन यायचा आणि आपली गुरे व कुटुंबाला पाणी द्यायचा.

थोड्यात दिवसांत जंगलातील पाणीसाठाही संपून गेला.

शेतकरी पाण्याच्या शोधात जंगलात फिरू लागला असता त्याला एक विलक्षण दृश्य दिसले. एक मोर आपल्या पिलांना नाचायला शिकवत होता. त्या पिलांनी मोराला विचारले,


''जर १२ वर्षे पाऊस पडणार नसेल तर आपण नाचून किंवा नाच शिकून काय फायदा ?''



मोर म्हणाला :– ''आपण जर आतापासून नाचणे किंवा नाच शिकणे बंद केले, तर जेव्हा १२ वर्षांनी पाऊस पडू लागेल तेव्हा आपण सारे नाचणे विसरुन गेलेले असू.''

शेतकरी हा संवाद ऐकून अवाक् झाला. तो धावतच घरी आला, शेतीची अवजारे गोळा केली आणि दुसऱ्या दिवशी आपल्या मुलांना घेऊन शेतावर गेला आणि कोरडे शेत नांगरू लागला. मुलांना शेतीची कामे शिकवू लागला. मुले चकित होऊन बाबाकडे पाहत होती.

त्यांनी वडिलांना विचारले : ''बाबा जर १२ वर्षे



पाऊस पडणार नसेल तर आपण आता शेत नांगरुन मशागत करुन काय फायदा ?''

शेतकरी म्हणाला, ''आपण शेतीची कामे कामे शिकलो नाही किंवा काम करणे बंद केले, तर १२ वर्षांनी पाऊस पडेल तोपर्यंत आपण सर्व कामे विसरुन जाऊ. आणि पुन्हा कामाला लागला.

इंद्रदेव आकाशातून या कुटुंबाला व शेतकऱ्याला काम करताना बघून अचंबित झाला. तो एका शेतकऱ्याचे रुप घेऊन त्या शेतात आला आणि शेतकऱ्याला विचारले:– ''तू आकाशवाणी ऐकली नाहीस का ?''



शेतकरी म्हणाला, ''होय, ऐकली पण जर मी काम केलं नाही किंवा माझ्या मुलांना शेतीची कामे शिकवली नाही, तर माझ्या पुढच्या पिढीला शेतीचे काहीच काम येणार नाही. मग जेव्हा पाऊस पडेल तेव्हा ते उपाशी राहतील.''

इंद्र सुन्न झाला, स्वर्गात आल्यावर विचार करु लागला की जर मी १२ वर्षे पाऊस पाडला नाही तर मीसुद्धा पाऊस कसा पाडायचा ते विसरुन जाईन. मग सर्व सृष्टी करपून जाईल, जैव सृष्टी नष्ट होईल. देवाने लगेच विचार बदलला. आपला शाप मागे घेतला आणि भरपूर पाऊस पाडायला सुरूवात केली.

ज्योतिबाला रामा पवार (स.शि.)

म.न.पा. प्रा.शा. विशांतीनगर, औरंगाबाद.

# वहीचे पान



जय होताच सर्वांचा लाडका. वर्गात बाईंचा व घरी आईबाबांचा लाडका ! तसा तो अभ्यासात हुशार होता. पण त्याला एक वाईट सवय होती. ''वह्यांचे पानं फाडणे'' वर्गात बाई त्याला वेळोवेळी समजवत. पण जयमध्ये काहीही फरक पडत नव्हता. हे वागणे त्याचे रोजचेच झाले होते.

एक दिवस रात्री गणिताचा अभ्यास करताना काही गणिते चुकली. नेहमीप्रमाणे त्याने टराटरा.. वहीची पानं फाडली व कोपऱ्यात चुरगळा करुन फेकली. हा आवाज ऐकून आई तिथे आली व म्हणाली.'' जय का, फाडतोयस वहीची पानं ?''

जय म्हणाला, ''माझे गणितं चुकले म्हणून''

''अरे पण ! एक फुली देऊन दुसरीकडे सोडवायचे, चूक लपवायची नाही, तर दुरुस्त करायची असते.''

जयने काहीही ऐकले नाही . रात्र बरीच झाल्याने तो झोपी गेला.

मध्यरात्री त्याला रडण्याचा आवाज आला. जयने इकडे-तिकडे पाहिले. त्याला कोणीच दिसेना. पण रडण्याचा आवाज मात्र येत होता, ''कोण रडतंय ?'' जयने हिंमत करुन विचारले. एका कोपऱ्यातून आवाज आला, ''मी कागदाचा बोळा रडतोय.''

जयने चकित होऊन पाहिले, ''कागदाचा बोळा ! पण का रडतोय ?''

कागदाचा बोळा म्हणाला, ''तुझ्यामुळे'' जयला काही कळेना. कागदाचा बोळा म्हणाला, ''शरीरातून एखादा अवयव काढून टाकावा तसे तू मला वहीमधून काढून टाकले.''

जय म्हणाला, ''अरे ! माझी गणितं चुकली म्हणून पानं फाडली.''

''बरं ! ठीक आहे, चूक कोणाची होती ?'' कागदाचा बोळा म्हणाला.

जय लगेच म्हणाला, 'माझी ! म्हणजे या हाताने चूक केली.'' चुरगळलेल्या कागदाने विचारले, ''मग तू हात तोडलास का ? नाहीना मग ही शिक्षा मला का देतोस ?'' तुला

आठवते का? तू नेहमी चुका करुन वहीची पाने फाडतोस. कधी विमान तयार करतोस

''अरे ! पण मला विमान तयार करायला खूप आवडतात.'' जय म्हणतो.

कागदाचा बोळा समजवत बोलला, ''त्यासाठी वहीचे पानं कशाला हवीत, वेगळी रंगीत कागदे मिळतात की ती वापर.''

जय म्हणाला,''बरं ! पण वही पूर्ण भरल्यानंतर रद्दीमध्ये तर टाकली जाते.''

चुरगळलेला कागद म्हणाला, ''एखादी आवडती गोष्ट म्हणजे पुस्तकचं घे की आपण सांभाळून ठेवतो. तसेच वहीमध्ये विविध विषयांचे ज्ञान साठवता येते. इतरांना वाटता येते.''

हे सर्व ऐकून जयला त्याची चूक कळते. तो माफी मागतो.

कागदाचा बोळा म्हणतो, ''तुला मी माफ करेल, पण एक वसा मात्र घ्यावा लागेल.''

जय म्हणतो, ''हो ! घेईल की, तो वसा सर्व मित्रांना पण सांगेल.''

''वहीमध्ये साठवूया ज्ञान

कधी न फाडू वहीचे पान''

हा वसा म्हणतच जयला जाग येते. एक सुंदर स्वप्न संपलेलं होतं. त्या दिवसापासून स्वप्नात घेतलेला वसा जय जागेपणीही पाळू लागला!

**ऊर्मिला भालेराव (स.शि.)**

म.न.पा., एकनाथनगर, औरंगाबाद.



# माझ्या स्वप्नातील औरंगाबाद शहर





# मूठभर गोष्टी

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

समग्र शिक्षा अभियान-शिक्षण विभाग